# प्रेसनोट

दि. २३/०४/२०२४

**तहसिलदार कार्यालय, हवेली, जि. पुणे येथील अव्वल कारकुनावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर. गु.र.नं. १३७/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४७ वर्षे |
| आरोपीचे नाव व पत्ता | नरेंद्र भानुदास ढोले, वय ४० वर्ष, पद अव्वल कारकुन, तहसिलदार कार्यालय, हवेली, पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/- रुपये |
| पडताळणीमध्ये लाच मागणी रक्कम | १,५०,०००/- रुपये (एक लाख पन्नास हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०८/०२/२०२४, दि. ०९/०२/२०२४, दि. १४/०२/२०२४, दि. १५/०२/२०२४, दि. २०/०२/२०२४ व दि. २०/०३/२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | २२/०४/२०२४ |

थोडक्यात माहिती :-

यातील तक्रारदार यांचे मालकीची जमीन पश्चिम चक्राकार मार्गासाठी संपादित होत असून, सदर जमिनीचा नुकसान भरपाई मोबदला म्हणून तक्रारदार ह्यांना रक्कम ३४,२०,३४८/- रुपये सरकारी कार्यालयाकडून मिळणार होती. तक्रारदाराच्या त्या जागेच्या सात-बारा उता-यावरील पोकळीस्त असलेली नोंद तहसिलदार, हवेली कार्यालयाकडून कमी होणार होती. ती नोंद कमी करण्यासाठी तक्रारदार ह्यांचे अर्ज प्रकरण तहसिलदार, हवेली कार्यालय येथे प्राप्त झाले होते. सदर अर्जाची पोकळीस्त नोंद कमी करण्यासाठी लोकसेवक नरेंद्र ढोले ह्यांनी तक्रारदार यांचेकडे तहसिलदार यांचेकरीता १,५०,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक नरेंद्र ढोले यांनी तक्रारदार यांचेकडे तहसिलदार, हवेली ह्यांचेकरीता १,५०,०००/- रुपये (एक लाख पन्नास हजार रुपये) ची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीची गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner